# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/०५/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

### मोटरसायकल चोरी करणाऱ्या

### आरोपीस नागपूर ग्रामीण पोलीसांनी केले जेरबंद

दिनांक ०१/०५/२०२४ रोजी फिर्यादी नामे– सचिन खुषालराव तुमडाम याचा लहान भाऊ शुभम खुषालराव तुमडाम वय ३० वर्ष हा त्यांची टि. व्ही. एस. रायडर मो.सा. क्र. एम.एच.–४०/सी. आर.–२६३७ याने जेवण करण्यासाठी रचना हॉस्पीटल बुट्टीबोरी च्या बाजूला असलेल्या जगत भोजनालय मध्ये जेवण करण्यासाठी गेला होता. त्याने आपली मो.सा. ही जगत भोजनालय बुट्टीबोरी च्या मेनगेटवर ठेवली होती तो जेवण करुन रात्री ११.३० वा. भोजनालयाचे बाहेर आला तेव्हा त्याची मोटार सायकल कोणीतरी अज्ञात चोराने निळया रंगाची मोटार सायकल टि.व्ही. एस.रायडर मो.सा. क्र. एम.एच.–४०/सी. आर. २६३७ चोरी करून नेली आहे. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरून पोस्टे बोरी येथे अप. क्र. ३६२/२४ कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये अनोळखी आरोपीचा शोध घेणे कामी वरीष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे गुन्हयाचे तपासकामी विशेष पथक गठीत करून अनोळखी आरोपीचा शोध घेणे सुरू केले. गठीत पथकातील स्टाफ यांना मिळालेल्या गोपनिय माहिती वरून बुट्टीबोरी येथील मच्छीमार्केट येथे असलेला **आरोपी नामे– राजीक बब्बु शेख, वय ३२ वर्ष रा. बुट्टीबोरी** यास ताब्यात घेवुन गुन्हया संबंधाने विश्वासात घेऊन विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. वरील नमुद आरोपीस सदर गुन्हयात अटक करण्यात आली. आरोपीचे ताब्यातून मोटार सायकल टि. व्ही. एस. रायडर मो.सा. क्र. एम. एच.–४०/सी. आर–२६३७ किंमती अंदाजे ९०,०००/– रू. मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग श्रीमती पूजा गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे बुट्टीबोरी येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक हृदयनारायण यादव, पोलीस हवालदार आशिष टेकाम, युनुस खान, कुणाल पारधी, पोशि आशिष कछवा यांनी पार पाडली.

# पोलीस स्टेशन कुही हद्दीत वाहनचालकांना वाहतुक नियमाबाबत पोलीसांनी केले मार्गदर्शन

पोलीस स्टेशन कुही हद्दीतील दुचाकी, चारचाकी वाहन चालकांना वाहतुकीचे नियमाचे पालन करण्याबाबत जनजागृती करण्याची मोहीम प्रभारी ठाणेदार यांनी हाती घेतली आहे. त्यासंबंधाने पोलीस स्टेशन कुही येथील वाहतुक पोलीसांकडुन वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहे तसेच प्रभारी ठाणेदार यांनी परीसरातील लोकांशी चर्चा करून त्यांना मोटारसायकल चालक यांनी हेल्मेटचा वापर करावा तसेच सोबत लायसन्स, गाडीचे आर सी बुक व इतर कागदपत्रे सोबत बाळगावे तसेच कोणीही ट्रिपलसीट मोटारसायकल चालविणार नाही याबाबत परिसरातील नागरीकांनी खबरदारी घेण्याचे तसेच चारचाकी वाहन चालकांना आपले वाहन चालवितांना सिटबेल्ट लावावे तसेच सोबत वाहनाचे आर सी बुक, इन्शुरन्स व इतर कागदपत्र बाळगणेबाबत प्रभारी ठाणेदार दिपक अग्रवाल यांनी आवाहन केले आहे. तसेच परिसरातील शाळा कॉलेजांना भेटी देवुन तेथील विदयार्थी यांच्याशी संभाषण करूण सर्वांनी लायसन्स काढण्याचे व वाहन चालवितांना वाहतुक नियमाचे पालन करण्याबाबत जनजागृती केली आहे. तसेच बाजारपेठा व चौकाचौकामध्ये गर्दीच्या ठिकाणी नुक्कड नाटक प्रसारीत करूण लोकांमध्ये वाहतुक नियमाचे पालन करणेबाबत जनजागृती करूण वाहतुक नियमाचे पालन करण्याचे आवाहन प्रभारी ठाणेदार श्री दिपक अग्रवाल यांनी परिसरातील नागरीकांना केले आहे.

सदरचे वाहतुकीबाबतचे मार्गदर्शन शिबीर व पथनाटय मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कुही येथील प्रभारी ठाणेदार दिपक अग्रवाल (भापोसे) व त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.





पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर